**प्रेसनोट** **दि.१०/०४/२०१९**

## मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर.

## चेन्नई येथून चोरी करुन पळालेल्या अंतरराज्य टोळीस मुंढवा पोलीस ठाणेकडून केले जेरबंद

दि.०७/०४/२०१९ रोजी मुंढवा पोलीस ठाणेकडील नेमणुकीस असणारे पोलीस नाईक निलेश जगताप यांना बातमीदारा मार्फत माहीती मिळाली की, आंतरराज्य टोळीने चेन्नई येथे काही दिवसांपुर्वी सोन्याचे दुकानातुन दागिने बनवण्याच्या सोन्याच्या लगडी चोरी केल्या असुन ती टोळी मुंढवा पो.स्टे हद्दीत केशवनगर भागात लपुन बसण्याकरीता आल्याचे समजले होते.

त्यानंतर मुंढवा पोलीस स्टेशन येथे स्टेशनचे मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपत भोसले यांचे आदेशान्वये, पोलीस उप निरीक्षक अमोल गवळी, सपोफौ सुरुश सोनवणे, पोहवा कैलास चव्हाण, पोना निलेश जगताप, अमोल गायकवाड, निलेश गायकवाड, अमोल चव्हाण, पोशि शाम शिंदे, श्रीनाथ जाधव, दिपक कांबळे,संदेश काकडे, सोमनाथ सावळकर असे केशवनगर भागात सदर टोळीचा शोध घेत असताना निलेश जगताप यांना सदरचे इसम हनुमाननगर येथे गोठयाजवळ आलेले आहेत अशी माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी जावुन खात्री करता तीन संशयीत इसम चौधरी गोठयाकडुन हनुमान नगर येथे जात असताना दिसले त्यांची व आमची नजरानजर होताच ते आम्हास पाहुन पळाल्याने त्यांना वरील स्टाफचे मदतने पकडुन त्यांना नाव व पत्ता विचारता १) राहुल गौतम काटे वय.२१ रा.शिंदेवस्ती चिकमहुद ता.सांगोला जि. सोलापुर. २) यल्लप्पा हनुमंत पवार वय.२७ रा.मापलेमळा आटपाडी ता.आटपाडी, जि.सांगली ३) प्रकाश अशोक येवळे वय.१९ रा.विकमहुद लक्ष्मीनगर, ता.सांगोला,जि. सोलापुर असे नावे सांगुन त्यांचेकडे चौकशी करुन अंगझडती घेतली असता त्यांचे पॅंटचे खिशात पिवळया धातुच्या सोन्याच्या लगडी मिळुन आल्याने व त्याबाबत त्यांचेकडे चौकशी केली असता खात्रीशीर माहिती देत नसल्याने सदरच्या पट्टया कोठुनतरी चोरुन आनलेले असावेत असा संशय बाळगल्याने सदरचे आरोपीना सीआरपीसी ४१(१)(ड) प्रमाणे ताब्यात घेऊन त्यांचेकडील एकुण २ किलो ६०० ग्रॅम वजनाच्या किं.रु ८४,७६,०००/- च्या सोन्याच्या लगडी पंचनाम्याने ताब्यात घेण्यात आल्या आहेत.

तसेच नमुद आरोपी यांनी सदरच्या लगडी एलिफंटा पोलीस स्टेशन,चैन्नई येथील गु.र.नं १७३/२०१९ भादंवि ३८१ मधील चोरुन आणल्या असलेबाबत खात्रीशीर माहिती मिळाल्याने व नमूद पोलीस ठाण्याचे पथकास संपर्क करुन नमूद मुद्देमाल चैन्नई पोलीसांचे ताब्यात देण्यात आलेला आहे.

सदर आरोपीतांचा मा.श्री.ए.बी.फुलारी,अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे, मा.श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५,पुणे,मा.श्री.सुनिल देशमुख, सहा.पोलीस आयुक्त, हडपसर विभाग, पुणे शहर, संपत भोसले,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,मुंढवा पोलीस ठाणे,यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक अमोल गवळी, सहा पोलीस फौजदार सुरेश सोनवणे,पोहवा कैलास चव्हाण,पोना निलेश जगताप, अमोल गायकवाड, निलेश गायकवाड, अमोल चव्हाण, पोशि शाम शिंदे, श्रीनाथ जाधव, दिपक कांबळे,संदेश काकडे,सोमनाथ सावळकर यांनी आरोपींचा शोध घेऊन चैन्नई येथे दाखल गुन्यातील अंतरराज्य टोळीला पकडुन उपरोक्त कामगिरी केली आहे.

**(संपत डी. भोसले)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर**